ज्ञानस्वरूप | श्रीगुरूदेव | कार्यस्वरूप



शेतकरी जगपोशिंदा

### श्रीगुरूदेव ग्रामगीता तत्वज्ञान आचार कार्य

# राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

# जन्म शताब्दी वर्ष महोत्सव



सत्ता लोकांचे हातात

## दि. ३० एप्रिल २००८ ते ३० एप्रिल २००९

**उद्‌घाटन व समारोप स्थळ :** भु-वैकुंठ अध्यात्म गुरूकुल गुरूकुंज मोझरी जि. अमरावती

## कार्यक्षेत्र – प्रत्येक गाव

गाव हा विश्वाचा नकाशा , गावावरून देशाची परिक्षा, गावचि भंगता अवदशा, येईल देशा ।। असे होऊ नये याकरिता नवयुग प्रणेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी काळानुसार ग्रामगीता व श्री गुरूदेव सेवामंडळ तत्वज्ञान निर्माण करून त्या कार्याचा शुभारंभ करून दिला. तेच कार्य शेवटावर नेण्याच्या प्रयत्नाने त्यांचा जन्मशताब्दी वर्षमहोत्सव आपल्याला साजरा करावयाचा आहे.

## ⁕ जन्मशताब्दी महोत्सवात करावयाचे महत्वपूर्ण कार्य ⁕

⁕प्रत्येक महिला पुरूष मतदात्यांनी आपल्या मालकी हक्काची जाणीव करून घ्यावी व त्याचा वापर करावा.

⁕निवडून देणारे हे मालक व निवडून येणारे हे सर्व कारभारी आहेत, ते स्वयंभू नसून बनविलेले आहेत.

⁕गावात ग्रामसभा व शहरात वार्ड सभेला सर्व मतदात्यांनी उपस्थित राहून प्रत्यक्ष लोकशाही अमलात आणावी.

⁕ग्रामसभेने गावात व वार्डसभेने शहरात नियोजन कार्य करावे , ग्रामपंचायत , नगरसेवकांनी ते अमलात आणावे.

⁕ग्रामसभा ही मालकांची असून ती स्वयंभू व सर्वोच्च आहे. लोकसभेपर्यंत सर्व सभा प्रतिनिधींच्या बनविलेल्या आहेत.

⁕सामुदायिक प्रार्थनेद्वारे गावात समन्वय व एकात्मता साध्य करून जनतेची महाशक्ती व आत्मबल सिद्ध करावे.

⁕गावातील जात,धर्म,पंथ, पक्ष, संप्रदाय राजकारण यातील भेदभाव दूर सारून गाव व वार्ड एक कुटुंब बनवावे.

⁕गावात व वार्डात न्यायमंडळ व ग्रामसंरक्षण दल तयार करून न्यायनिवाडा व संरक्षण व्यवस्था करावी.

**⁕चरसंडास व संडास जोडलेल्या गोबरगॅसद्वारे मलमुत्राचे नियोजन करून गाव स्वच्छ, सोनखत युक्त, हागणदारी व रोग मुक्त करावे. सेंद्रिय शेती करून सत्वशील धान्याचे उत्पादन करावे.**

⁕गावातील दुर्व्यसने व प्रत्येक कार्यातील अंधश्रद्धा ,अनिष्ट प्रथा बंद करून त्यातील व्यर्थ जाणारा पैसा, श्रम व वेळ वाचवावा. बेकारी हटविण्याकरिता गावात ग्रामोद्योग व घराघरात कुटीर उद्योगाद्वारे कच्च्या मालाचा पक्का माल करावा.

## हे कार्य करण्याकरिता जनतेत असलेले महान सामर्थ्य

⁕ अहो जनशक्ती केवढी महान, जो ती आणेल संघटोन, तो स्वर्गावरही लावेल निषाण, आपुल्या कार्ये।

⁕ संघटनेचा मूल मंत्र, सज्जनांनी व्हावे एकत्र, संघटन हेचि शक्तीचे सूत्र, ग्रामराज्य निर्माण करी।

⁕ जनतंत्राचा हा काळ, शक्ती लोकाअंगीच सकळ, जनतेच्या निश्चयाचे बळ, साम्राज्यासही नमवू शके।

⁕ गाव करी ते राव न करी, ऐसे सांगुनी ठेविले चतुरी, जरी दाद न देती अधिकारी, तरी गाव त्या सुधारू शके।

⁕ गावचे जे पवित्र सेवक, तेच प्रसंगी होती सैनिक, ज्या गावी ऐसे सावध पाईक, तेथे विघ्न न ठाके।

अशा या महान जनशक्तीला आपल्याच सुखासाठी प्राण पणाला लावून हा जन्मशताब्दी वर्ष महोत्सव साजरा करावयाचा आहे. जी गावे, जी कुटुंबे , ज्या व्यक्ती या कार्यात अग्रेसर ठरतील त्यांचा जाहिर रित्या सत्कार करून त्यांना प्रमाणपत्र देण्यात येतील. त्यांनी आपुल्या केलेल्या कार्याचे सर्व अहवाल समारोपापूर्वी समारोप स्थळी पाठवावे. अशा प्रकारे सर्वांनी सर्व मिळून सर्व प्रकारे एकमेकाला सहयोग देऊन व सहकार्य करून आपआपल्या परीने हा जन्मशताब्दी वर्ष महोत्सव सुसंपन्न करावा ही सर्व जनता जनार्दन चरणी नम्र प्रार्थना.

**विनित**

भु-वैकुंठ समिती , आत्मानुसंधान अड्याळ टेकडी, त. ब्रम्हपूरी, जि. चन्द्रपूर